*महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे येथील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या बळकटीकरण प्रस्तावास मान्यता देण्याबाबत...*

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

## राहुरी, जि. अहमदनगर

विद्यापीठ निर्णय जा.क्र. एमटीजी-३ (७०६)/५६/२०२४ दि. १४/१०/२०२४

**वाचा** - १. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांकः मफुवि-२०२०/प्र.क्र.६६/७अे, दि. ०२/१२/२०२०

२. महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे याचे पत्र दि.२९/०३/२०२४

३. महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे याचे पत्र दि.२५/०६/२०२४

४. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांकः मफुवि-१४२३/प्र.क्र.११५/७अे, दि. ९/०८/२०२४

**पार्श्वभूमी -**

महाराष्ट्रातील खिल्लार, डांगी, लालकंधारी, देवणी व कोकण कपिला या जाती प्रामुख्याने ओढ कामासाठी प्रसिध्द असून त्यांचे दूध उत्पादन कमी आहे. तर भारतात आढळणाऱ्या देशी गायींमध्ये प्रामुख्याने साहिवाल, गीर, थारपारकर, लालसिंधी या दूध उत्पादनासाठी प्रसिध्द असून त्यांचा उपयोग देशी गायींमध्ये सुधारणा करण्यासाठी केला जातो.

संकरीत गायींचे उत्पादन हे देशी गायीच्या उत्पादनापेक्षा जास्त असून देशामध्ये व महाराष्ट्रातील वेगवेगळया भागामध्ये स्थानिक वातावरणामध्ये समरस होताना त्यांच्यामध्ये अडचणी दिसत आहेत. भारतीय देशी गायी देशातील कोणत्याही वातावरणामध्ये समरस होताना दिसून येतात आणि त्यांच्यामध्ये ताण सहन करण्याची क्षमता, रोगप्रतिकारक क्षमता, गोचिड प्रतिबंध गुण आढळतात. सध्या देशी गायींच्या विविध वैशिष्ट्यामुळे व दूध व दुग्धजन्य पदार्थ, गोमूत्र, शेण या पदार्थांना वाढलेल्या मागणीमुळे शेतकरी मोठ्या प्रमाणावर देशी गोपालानाकडे ओढला जात आहे.

महाराष्ट्रामध्येही मोठ्या प्रमाणामध्ये गीर, सहिवाल जातीच्या गायी पाळल्या जात आहेत. त्यासाठी देशी गायीचे शास्त्रीय दृष्ट्या संवर्धन, सुधारणा व संशोधन होणे गरजेचे आहे. चारा उत्पादन, चारा प्रक्रिया जनावरांचे आरोग्य, देशी गायीचे दूध व दुग्धजन्य पदार्थ, शेण, गोमुत्र, अंशमुक्त व सेंद्रिय दूध उत्पादन इ. विषयावरती शास्त्रीय अभ्यास व संशोधन होणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र शासन कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय दि. ०२.१२.२०२० नुसार महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, येथे देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र उभारणीस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरील संशोधन व प्रशिक्षण केंद्र कृषि महाविद्यालय, पुणे येथील पशुसंवर्धन

व दुग्धशास्त्र विभागामध्ये उपलब्ध जुन्या गोठ्यांचा व इतर सुविधांचा वापर करून सुरु करण्यात आलेले आहे. मात्र या संशोधन व प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रमुख सुविधांचा अभाव असल्यामुळे या केंद्राच्या बळकटीकरणाचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून यामध्ये प्रामुख्याने अद्ययावत प्रयोगशाळा, उपकरणे, नवीन गोठ्यांचे बांधकाम, जुन्या गोठ्यांची दुरुस्ती, चाऱ्यासाठी सायलो बंकर, उंदीर प्रतिबंधक गोदाम, गोबर गॅस प्रकल्प, प्रदर्शन व विक्री केंद्र, चतुर्थश्रेणी कर्मचारी निवासस्थाने, अंतर्गत रस्ते, पाणी पुरवठा व संरक्षक भिंत, मिल्कींग पार्लर, साठवणूक गोदाम, गांडुळ खत प्रकल्प, प्रशिक्षण हॉल, शेतकऱ्यांसाठी निवास, कार्यालय व प्रयोगशाळा इमारत, सौर ऊर्जा प्रकल्प इ. बाबींचा समावेश आहे.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे येथे देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या बळकटीकरणासाठी अद्ययावत गायीचे गोठे, जुन्या गोठ्याचे नुतनीकरण, सायलो बंकर, उंदीर प्रतिबंधक गोदाम, बायोगॅस युनिट, कर्मचारी यांचे निवासस्थान, कार्यालय तथा प्रदर्शन गॅलरी इत्यादी कामांची बांधकामे करणेबाबतच्या प्रस्तावास महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी परिषदेच्या दि. १३/०२/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत ठराव क्र. १४/१०९/२०२३ अन्वये मान्यता प्रदान केली असून निधी उपलब्ध होणेबाबत शासनास शिफारस केली आहे.

सध्या देशी गायींना व त्यांच्या पासूनच्या दूध व दुग्धजन्य पदार्थ, शेण गोमुत्र प्रक्रिया उत्पादनांना मागणी वाढत आहे. प्रकल्प कार्यान्वित असलेला विभाग हा १३५ वर्ष जुन्या वास्तूत आहे. विविध जुन्या वास्तू या जीर्ण अवस्थेत असून मोडकळीस आलेल्या आहेत. म्हणून विभागात पक्के रस्ते, गोठ्यांचे नुतनीकरण/सुधारणा व नवीन इमारती, प्रशिक्षण वर्ग, शेतकऱ्यांसाठी अतिथीगृह, गो उत्पादनांचा मॉल, अद्ययावत प्रयोगशाळा, शहरातील नागरिकांना गोमय उत्पादनांची माहिती होऊन मागणी वाढण्याकरीता, नवीन पिढी गो पालनाकडे वळून, विविध देशी जातींचे गो संवर्धन होण्याकरिता देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र प्रकल्पाचे नुतनीकरण, उभारणी व अद्ययावत सुधारणा करणे गरजेचे आहे.

राज्यात देशी गायीचे शास्त्रीय दृष्ट्या संवर्धन, सुधारणा व संशोधन होणे गरजेचे आहे. उपरोक्त संदर्भ क्र. १ येथील दि. ०२.१२.२०२० च्या शासन निर्णयान्वये देशी गायींचे संवर्धन व कार्यक्षमता वाढवून दूध व दुग्धजन्य उत्पादनात वाढ करण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे येथील पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागांतर्गत "देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र" स्थापन करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तथापी, या संशोधन व प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रमुख सुविधांचा अभाव असल्यामुळे या केंद्राच्या बळकटीकरणास व त्याकरीता रु.७०७५.२२ लाख इतक्या निधी खर्चास संदर्भ क्र. ४ च्या शासन निर्णयान्वये मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.

**विद्यापीठ निर्णय -**

१. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे येथील पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागांतर्गत उभारण्यात आलेल्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या बळकटीकरणास संदर्भ क्र.४ या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

२. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे येथील पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागांतर्गत उभारण्यात आलेल्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या बळकटीकरणासाठी आवर्ती खर्च रु. ४३८.७६ लाख व अनावर्ती खर्च रु. ६६३६.४६ एकूण रुपये असे एकूण रु.७०७५.२२ लाख (अक्षरी : रुपये सत्तर कोटी, पंच्याहत्तर लाख, बावीस हजार मात्र) इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सदरचा खर्च या शासन निर्णयासोबतच्या "परिशिष्ट-अ" नुसार करण्यात यावा.

"देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र" बळकटीकरणासाठी शासनाच्या निश्चित करण्यात आलेल्या अटी व शर्तीचे आणि शासनाकडून वेळोवेळी दिल्या जाणा-या निर्देशांचे काटेकोर पालन करण्यात यावे. सदर केंद्रावर संशोधन व प्रशिक्षणाचे कामकाज होणेच्या दृष्टीने "परिशिष्ट-क" वर दर्शविण्यात आलेल्या शास्त्रज्ञांच्या सेवा तांत्रीक सल्लागार म्हणून आवश्यकता भासेल त्याप्रमाणे तांत्रीक नियंत्रण अधिकारी यांच्या मान्यतेने उपलब्ध करुन घेण्यात याव्या.

डॉ.सोमनाथ ह. माने, सहाय्यक प्राध्यापक (पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र), विभागीय विस्तार केंद्र, कृषि महाविद्यालय, पुणे हे प्रमुख शास्त्रज्ञ व योजना प्रमुख म्हणून तर "परिशिष्ट ब" वर दर्शविण्यात आल्याप्रमाणे संबंधीत अधिकारी हे सह-संशोधक म्हणुन काम पाहतील. प्रमुख शास्त्रज्ञ व योजना प्रमुख हे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील. Uni.Reso. No.MTG-2(88)/354/of 2015 Dated 31.03.2015 अन्वये योजना प्रमुख यांना असलेले वित्तीय व प्रशासकीय अधिकार त्यांना लागू असतील. प्राध्यापक, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र, कृषि महाविद्यालय, पुणे या केंद्राचे तांत्रिक नियंत्रक राहील तर सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, पुणे यांच्याकडे या केंद्राचे प्रशासकीय नियंत्रण राहील. या केंद्राचे संपूर्ण नियंत्रण संचालक संशोधन, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्याकडे असेल.

सदर केंद्राच्या कामकाजाकरीता आवश्यक असलेल्या शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाची पूर्तता पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र, कृषि महाविद्यालय, पुणे येथे विद्यमान स्थितीस कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी तसेच आवश्यकतेनुसार कंत्राटी मनुष्यबळ घेऊन यांच्या उपलब्धतेतून भागविण्यात यावी. शासनाने वितरीत केलेला निधी हा विहीत लेखा पध्दतीचा अवलंब करुन, उद्दिष्टाकरीता प्रकल्प कालावधीमध्ये पूर्णतः खर्च होईल याबाबत संपूर्ण दक्षता घेण्यात यावी.

संशोधन संचालक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी हे प्रकल्पाचे संनियंत्रण करणे व प्रगतीचा आढावा घेणे इ. बाबत विहीत कार्यपध्दतीनुसार शासनास व मा. कुलगुरु यांना वेळोवेळी अहवाल सादर करतील.

सदरचा विद्यापीठ निर्णय नियंत्रक, मफुकृवि, राहुरी यांचे अनौपचारीक संदर्भ क्र. ९१० व्हीसी, दि. ०९/०९/२०२४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

**स्वाक्षरीत/-**
**(मुकुंद शिंदे)**
**कुलसचिव**

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव-**

१. उपसचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, मादाम काम रोड, हुतात्मा राजगुरु चौक, नरीमन पॉईट, मुंबई ४०० ०३२,
२. संचालक (संशोधन), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे ४११ ००७,
३. संचालक, विस्तार शिक्षण / संशोधन / शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीट, राहुरी,
४. अधिष्ठाता (कृषि), महात्मा फुले कृषि विद्यापीट, राहुरी,
५. सहयोगी अधिष्ठाता (सर्व),
६. विभाग प्रमुख (सर्व),
७. सहयोगी संशोधन संचालक (सर्व),
८. प्राचार्य, कृषितंत्र विद्यालय (सर्व),
९. प्रभारी, कृषि संशोधन केंद्र/ प्रकल्प (सर्व),
१०. डॉ. सोमनाथ ह. माने, सहाय्यक प्राध्यापक, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र, विभागीय विस्तार केंद्र, कृषि महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे,
११. परिशिष्ठ - 'ब' व 'क' वर नमूद सर्व संबंधीतांना, त्यांचे कार्यालयामार्फत
१२. विद्यापीठ ग्रंथपाल / नियोजन अधिकारी, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
१३. नियंत्रक / विद्यापीठ अभियंता, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
१४. उप कुलसचिव (प्रशासन) / (विद्या), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
१५. अधिदान व लेखाधिकारी, महात्मा फुले कृषि विद्यापीट, पुणे,
१६. मा. कुलगुरु / कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, महात्मा फुले कृषि विद्यापीट. राहुरी.

**(विजय त्र्यं.पाटील)**
**उप-कुलसचिव (प्रशासन)**

**परिशिष्ट "अ"**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे येथील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या बळकटीकरणास मान्यता देण्याबाबत.

(शासन निर्णय क्र.मफुवि-१४२३/प्र.क्र.११५/७-अे , दि.०९/०८/२०२४च परिशिष्ट)

**आवर्ती खर्च-**

रु. लाखात

| अ.क्र. | घटक | वर्ष | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २०२४-२५ | २०२५-२६ | २०२६-२७ | २०२७-२८ | |
| १. | कंत्राटी मनुष्यबळ | १८.१२ | १९.९३ | २१.९३ | २४.१२ | ८४.१० |
| २. | चारा पशुखाद्य | ४७.७७ | ५९.७१ | ७१.६५ | ९५.५३ | २७४.६६ |
| ३. | कार्यालयीन व इतर खर्च | २.०० | २.०० | २.०० | २.०० | ८.०० |
| ४. | प्रशिक्षणकार्यशाळा | २.०० | २.०० | २.०० | २.०० | ८.०० |
| ५. | जनावरांचा विमा | ४.०० | ४.०० | ४.०० | ४.०० | १६.०० |
| ६. | रासायनिक द्रव्य, कीट्स | १.०० | १.०० | १.०० | १.०० | ४.०० |
| ७. | जनावरांची औषधे | १.०० | १.०० | १.०० | १.०० | ४.०० |
| ८. | गोठीतभ्रूण, भ्रूण प्रत्यारोपण, लिंगनिहाय, वीर्यकांड्या | १०.०० | १०.०० | १०.०० | १०.०० | ४०.०० |
| | **एकूण आवर्ती खर्च** | **८५.८९** | **९९.६४** | **११३.५८** | **१३९.६५** | **४३८.७६** |

अनावर्ती खर्च-

रु. लाखात

| अ.क्र. | घटक | वर्ष | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २०२४-२५ | २०२५-२६ | २०२६-२७ | २०२७-२८ | |
| १. | गायींचागोठा, सायलोबंकर, रँट प्रुफगोदामे, बायोगॅस यूनिट, कर्मचारी वसाहत, कार्यालयीन इमारत, प्रदर्शन प्रशिक्षणकेंद्र बांधणे | २६४१.५० | २६४१.५० | - | - | ५२८३.०० |
| २. | डेअरी संयंत्र व इतर यंत्र सामुग्री | ८४३.३३ | - | - | - | ८४३.३३ |
| ३. | अवजारे | ३९३.५७ | - | - | - | ३९३.५७ |
| ४. | पशुपोषण प्रयोगशाळा | - | ३२.९० | - | - | ३२.९० |
| ५. | दुग्ध प्रयोगशाळा | - | १.६६ | - | - | १.६६ |
| ६. | भ्रूण प्रत्यारोपण प्रकल्पासाठी वाहन व बॅटरीचलित क्लब व्हॅन | ३२.०० | - | - | - | ३२.०० |
| ७. | इतर खर्च | १२.५० | १२.५० | १२.५० | १२.५० | ५०.०० |
| | **एकूण अनावर्ती खर्च** | **३९२२.९०** | **२६८८.५६** | **१२.५०** | **१२.५०** | **६६३६.४६** |
| | **एकूण आवर्ती+अनावर्ती खर्च** | **४००८.७९** | **२७८८.२०** | **१२६.०८** | **१५२.१५** | **७०७५.२२** |

**(विजय त्र्यं. पाटील)**
**उप-कुलसचिव (प्रशासन)**

**परिशिष्ट "ब"**

देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र, कृषि महाविद्यालय, पुणे

सह-संशोधकांची यादी

| **अ.क्र.** | **सह-संशोधक यांचे पदनाम** |
|---|---|
| १. | सहयोगी प्राध्यापक<br>पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, कृमवि, पुणे |
| २. | सहाय्यक प्राध्यापक<br>पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, कृमवि, पुणे |
| ३. | सहाय्यक प्राध्यापक<br>पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, कृमवि, पुणे |
| ४. | सहयोगी/सहाय्यक प्राध्यापक (पशुवैद्यक शास्त्र)<br>पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, कृमवि, पुणे |

(विजय त्र्यं. पाटील)
उप-कुलसचिव (प्रशासन)

परिशिष्ठ - "क"

**देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र, कृषि महाविद्यालय, पुणे तांत्रीक सल्लागार म्हणून निमंत्रीत करावयाच्या शास्त्रज्ञांची यादी**

| अ.क्र. | शास्त्रज्ञ यांचे नाम व पदनाम |
|---|---|
| १. | डॉ. एन. व्ही. पाटील,<br>मा. कुलगुरू, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर |
| २. | डॉ. व्ही. के. पाटील,<br>सह आयुक्त, केंद्रीयगो प्रजनन प्रक्षेत्र, सुरतगढ, जि. श्रीगंगानगर, राजस्थान |
| ३. | डॉ. शितलकुमार मुकणे,<br>सदस्य सचिव, महाराष्ट्र गो-सेवा आयोग, महाराष्ट्र शासन |
| ४. | डॉ. लथवाल एस. एस.<br>प्रमुख शास्त्रज्ञ (पशु उत्पादन व व्यवस्थापन) आणि प्रभारी अधिकारी<br>एल.आर.सी.एन.डी.आर.आय, कर्नाल |
| ५. | डॉ. बी. बी. टोंबरे,<br>सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, लातूर |
| ६. | डॉ. संजय मंडकमाले,<br>माजी वरिष्ठ शास्त्रज्ञ, शेळीसुधार प्रकल्प, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी |
| ७. | डॉ. एस. इ. जाधव,<br>प्रमुख शास्त्रज्ञ, पशुआहार विभाग, भारतीय पशुवैद्यक संस्था, इज्जतनगर, उत्तर प्रदेश |
| ८. | डॉ. पी.टी. ढोले,<br>माजी प्राध्यापक, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, पुणे |
| ९. | डॉ. व्ही. ई. नरवडे,<br>वरिष्ठ शास्त्रज्ञ, शेळीसुधार प्रकल्प, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी |
| १०. | डॉ. श्याम झवर,<br>सदस्य, राष्ट्रीय सल्लागार समिती, (IVF) राष्ट्रीय गोकुळ मिशन, नवी दिल्ली, भारत सरकार |
| ११. | डॉ. एस. व्ही. भहीरे,<br>शास्त्रज्ञ पशुवैद्यकोय, आयव्हीआरआय, कॅंपस, पुणे |
| १२. | मा.कुलगुरु यांचे मान्यतेने गरजेनुसार नेमलेला तांत्रीक सल्लागार |

**(विजय त्र्यं. पाटील)**
**उप-कुलसचिव (प्रशासन)**